# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**आस्थापना विभाग**

पत्ता:- छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, १ ला माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर

(फोन नं. २५६७०३२) email-gadnmcnagpur@gmail.com

**क्रमांक:- 77 /आस्थापना** **दिनांक:- १२/०५/२०२३**

## - सुचना -

**विषय :-** कनिष्ठ स्वास्थ निरीक्षक या पदाच्या प्रत्यक्ष मुलाखती बाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्रमांक नामपा-१२२३/प्र.क्र. ७१/नवि-२६, दिनांक १० मे २०२३ (नागपूर महानगरपालकेच्या १७९८१ पदांच्या एकत्रित आकृती बंधास मान्यता देण्याबाबत.)

२) परिपत्रक क्र. ६८/आस्थापना, दि. ०९/०५/२०२२ च्या अनुषंगाने

३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक:- ५३/आस्थापना दिनांक:- ०८/०५/२०२३

नागपूर महानगरपालिका ठराव क्र. १६८, दि. २६/१०/२०१५ मधील "ब" नुसार कनिष्ठ स्वास्थ निरीक्षक पदे परिपत्रकाद्वारे भरण्याकरीता परिपत्रक क्र. ६८/आस्थापना, दि. ०९/०५/२०२२ निर्गमीत करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जातील पात्र उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती दि. १७/०५/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. अपर आयुक्त (शहर) यांचे कक्षात घेण्यासंबंधाने पात्र उमेदवारांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक:- ५३/आस्थापना दिनांक:- ०८/०५/२०२३ अन्वये अवगत करण्यांत आले.

मात्र संदर्भीय १ चे शासन निर्णय क्रमांक नामपा-१२२३/प्र.क्र. ७१/नवि-२६, दिनांक १० मे २०२३ (नागपूर महानगरपालकेच्या १७९८१ पदांच्या एकत्रित आकृती बंधास मान्यता देण्याबाबत.) चा निर्णय प्राप्त झाला असून यात कनिष्ठ स्वास्थ निरीक्षक हे पद स्वच्छता निरीक्षक या पदामध्ये समायोजीत करण्यांत आलेले असल्याने तसेच सदर आकृतीबंधात **कनिष्ठ स्वास्थ निरीक्षक हे पद अस्तित्वात नसल्याने** वरील मुलाखत तुर्तास स्थगित करण्यांत येत आहे.

करिता सर्व विभाग प्रमुख यांनी उपरोक्त सुचना आपले विभागातील वरील परिपत्राकाचे अनुषंगाने पात्र उमेदवारांचे लक्षांत आणुन दयाव्यात व तशी नोंद ठेवावी.

(प्रकाश वराडे)
सहाय्यक आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी,

१) सर्व विभाग प्रमुख, मनपा, नागपूर

२) सर्व सहाय्यक आयुक्त, झोन क्रमांक १ ते १०,

३) माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, माहिती व तंत्र ज्ञान विभाग, मनपा, नागपूर मनपा च्या संकेत स्थळावर वरील सुचना प्रसिध्दी करण्याबाबत.

CamScanner